महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२२ वा | दिनांक : ०६/०२/२०२५ | वार : गुरूवार


## जिथे दिसेल तिथे ठेचा आणि गाडा : उदयनराजे



**सातारा :** अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानावर छत्रपतींचे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनीही संताप व्यक्त केला आहे. महापुरुषांबद्दल अशी विधाने करणाऱ्या लोकांना दिसेल तिथे ठेचले पाहिजे, असे टोकाची प्रतिक्रिया उदयनराजे यांनी दिली. या विकृतीची वाढ झाल्यास देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल, असेही ते म्हणाले. राहुल सोलपूरकरने तसे विधान केले तर त्याला औरंगजेबाची औलादच म्हणायला पाहिजे, असा संताप उदयनराजे यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आग्र्याहून सुटका करताना मुघलांना लाच दिली होती, असे विधान अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केले होते. त्यानंतर त्यांच्याविरोधात राज्यात संतापाची लाट उसळली. राज्यभरातील शिवप्रेमींनी त्यांच्या या विधानाचा निषेध केला. ठाकरे गटाच्या वतीने त्यांच्या घरासमोर आंदोलनही केले होते. त्यात आता उदयनराजे भोसले यांनीही संताप व्यक्त केला आहे.

अशा विधानामुळे मलाच नाही, तर अनेक शिवप्रेमींना वेदना होतात. हा राहुल सोलापूरकर म्हणजे कोण आहे? तो जो म्हणाला लाच. जे लाच घेतात यांना लाचपलिकडे काही समजत नाही. अशा लोकांच्या जीभा हासडल्या गेल्या पाहिजे. महापुरुषांबद्दल अशी विधाने करणाऱ्या लोकांना दिसेल तिथे ठेचले पाहिजे. वेचून ठेचले पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया उदयनराजे यांनी दिली. ही विकृतीची वाढ झाली तर देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल. वेगवेगळ्या जातीधर्मात अशा विकृतांमुळे तेढ निर्माण होते, असेही ते म्हणाले.

या विकृतीची वाढ झाल्यास देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल. विकृत लोकांमुळेच वेगवेगळ्या जातीधर्मात तेढ निर्माण केले जातात. राहुल सोलपूरकरांबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बोलणार आहे. महापुरुषांबाबत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, त्यांच्यावर देशद्रोहाचा कायदा लागू केला पाहिजे, यासाठी मी अमित शहांची देखील भेट घेणार असल्याचे उदयनराजे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आपण जपले नाही, तर देशाचे तुकडे व्हायला फार काळ लागणार नाही. विकृत विधाने करणाऱ्यांना थांबवले पाहिजे. त्यांचे सिनेमे बंद केले पाहिजे. निर्माते, दिग्दर्शकांनीही अशा लोकांनाही थारा देऊ नये, असे आवाहन उदयनराजे भोसले यांनी केले.

या लोकांना गाडले पाहिजे. त्यांना गाडले नाही तर देशाच्या अखंडतेचा प्रश्न आहे. कठोर शब्दात मी निषेध करतो. त्याला गोळ्या घालून मारले पाहिजे. त्यालाच नाही तर असे जे जे लोकं असतील त्या सर्वांना गोळ्या घातल्या पाहिजे. कुणीही बेताल विधाने करायचे. जीवाची पर्वा न करता शिवाजी महाराज पुढे गेले. अशा महापुरुषांबद्दल अशी विधाने होत असतील, तर दुसरा काही पर्याय नाही. तो जिथे दिसेल त्याला ठेचा आणि गाडा, असा संताप उदयनराजेंनी व्यक्त केला.

आज आपण शिवाजी महाराजांची प्रतिमा देव्हाऱ्यात ठेवतो. का तर, बाकीच्यांनी साम्राज्य वाढवण्यासाठी लढाया केल्या. पण शिवाजी महाराज गोरगरीबांसाठी लढले. स्त्रीयांचे संरक्षण केले. परकीय आक्रमण थोपवले. अशा लोकांवर वेळीच आळा घातला नाही, तर आपल्या इतिहासाला वेगळे वळण देतील. कालांतराने शिवाजी महाराजांना वेगळे दाखवतील. असे ते म्हणालेत.

राहुल सोलपूरकरवर कारवाई करा. देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा. तुरुंगात टाका. एक दोन दिवसात अमित शाह यांची भेट घेणार. आधीही त्यांना भेटलो होतो. खासदार असो की मंत्री असो शोधून गाडले पाहिजे. ठेचले पाहिजे. ही चूक नाही तर घोडचूक आहे. औरंगजेबच्या भेटीला जाताना लाच दिली म्हणून भेटीला गेले. तसे नव्हते. त्यांच्या शौर्याचं प्रतिक होते. लाच कशाला देतील. राहुल्याची लायकी काय आहे? राहुल तसे विधान केले तर त्याला औरंगजेबाची औलादच म्हणायला पाहिजे. त्याच्यावर किती चर्चा करायची. त्याला ठेचा ना. किती वेळ लागतोय, असेही उदयनराजे म्हणाले.

## देवेंद्र फडणवीस बाहुबली तर मी शिवगामिनी




**बीड :** आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी भाषण केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी आमदार सुरेश धस यांना मिश्किल टोला देखील लगावला आहे.

या जिल्ह्याचे आमदार ज्यांना २००९ मध्ये पहिला गुलाल लागला तो भारतीय जनता पक्षाकडूनच लागला ते आता पुन्हा २०२४ मध्ये आमदार म्हणून निवडून आले आहेत आणि ज्यांनी या सभेचे आयोजन करण्यासाठी मोठा सहभाग घेतला आहे ते म्हणजे सुरेश धस, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख केला आहे.

पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल नेहमीच आदरभाव आहे. मात्र आज त्यांच्याबद्दल ममत्त्व भाव निर्माण होत असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. आज फडणीसांना बाहुबली म्हणणारे पूर्वी मला शिवगामिनी म्हणत होते. त्यामुळे माझे वचनच माझे शासन आहे, असे देखील पंकजा यांनी म्हटले आहे. बोलणार एक आणि करणार एक हे माझ्या रक्तात नाही. मी गोपीनाथ मुंडे यांची लेक आहे. हे लक्षात ठेवा, अशा शब्दात मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांना प्रत्युत्तर दिले आहे. सुरेश धस यांना मी आज देखील अण्णाच म्हणते, असं देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, गोपीनाथ मुंडेंएवढा पहाडासारखा माणूस याच जिल्ह्याने महाराष्ट्राला दिल्याचेही सुरेश धस यांनी म्हटले. तसेच, शिरुर आणि पाटोदा तालुक्यासाठी आणखी ३.७ टीएमसी पाणी देण्याची मागणी केली. देवेंद्र बाहुबली हेच आमचं काम करु शकतात, तुमच्याकडूनच आम्हाला अपेक्षा आहे, असे म्हणत ही योजना मंजूर झाल्यास मी जिवंत राहिल किंवा नाही, पण या मतदारसंघातून भाजपचाच आमदार राहिल, असे आश्वासन आमदार सुरेश धस यांनी दिले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ फेब्रुवारी २०२५


## पळून जाणाऱ्या पत्नी व तिच्या प्रियकराला पतीने बसस्थानकावरच काठीने झोडपले

**सिल्लोड (राहुल थेटे) :** प्रियकरासोबत पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या पत्नीला आणि तिच्या प्रियकराला सिल्लोड बसस्थानकावर सोमवारी (३ फेब्रुवारी) दुपारी १२ वाजता पतीने रंगेहाथ पकडले. त्यानंतर दोघांनाही बसस्थानकातच काठीने बेदम मारहाण सुरू केली. यात पत्नीचा एक हात मोडला, डोके फुटले, तर प्रियकर जखमी झाला. शहर पोलिसांनी बसस्थानकात येऊन तिघांनाही पोलीस ठाण्यात नेले. मात्र प्रकरण आपसात मिटल्याने सोडून दिले.

त्यानंतर त्याच्या पत्नीने मंगळवारी (४ फेब्रुवारी) सायंकाळी पुन्हा शहर पोलीस ठाण्यात येत पतीविरुद्ध तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. काय आहे प्रकरण...घाटनांद्रा येथील ३० वर्षीय विवाहितेचे भराडी येथील युवकासोबत अनैतिक संबंध जुळले. ती वासनेच्या इतकी आहारी गेली की प्रियकरासोबत पळून जाण्याचे ठरवले. प्रेमीयुगुल सिल्लोड येथील बसस्थानकावर येताच त्यांचा पाठलाग करत आलेल्या पतीने दोघांना रंगेहात पकडले. तो सोबत काठी घेऊनच आला होता. पत्नी आणि तिचा प्रियकर एकत्र पाहून त्याचा संताप अनावर झाला.

त्याने दोघांनाही तिथेच काठीने झोडपायला सुरुवात केली. प्रवाशांना हे नक्की काय सुरू आहे, हे कळत नव्हते. काही जण सुरुवातीला मध्ये पडले, पण त्यांना प्रकरणाची सत्यता कळल्यानंतर तेही बाजूला झाले. पती दोघांना काठीने बेदम झोडपत असताना पत्नीचा हात मोडला, तिचे डोके फुटले. प्रियकरही जखमी झाला.अनेकांनी या घटनेचे मोबाइलमध्ये व्हिडीओही काढले. नंतर ते सोशल मीडियावर व्हायरल केले. बसस्थानकावर सुरू असलेला हा राडा पोलिसांना कळल्याने त्यांनी तातडीने बसस्थानकावर येत तिघांनाही ताब्यात घेतले व पोलीस ठाण्यात आणले. पतीने पोलिसांना हकीकत सांगितली. मात्र त्यांनी हे प्रकरण आपसात मिटवले. पोलिसांनी तिघांनाही सोडून दिले.

त्यानंतर पत्नी व तिच्या प्रियकराने रुग्णालयात उपचार घेतले. मंगळवारी सायंकाळी पत्नीने पतीच्या विरुद्ध पुन्हा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. बेदम मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार तिने दिली. त्यावरून पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची चर्चा अवघ्या सिल्लोड तालुक्यात घडत आहे.

## ॲड. कृष्णा पुंडलिकराव जाधव महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**कन्नड (राहुल थेटे) :** कृष्णा जाधव बी. ए. एल. एल. बी. उच्च पदवीधर असून कन्नड तालुका वकील संघाचे, तालुका अध्यक्ष देखील आहे. विश्वकर्मा नागरी सहकार पथसंस्था शाखेचे चेअरमन म्हणून सध्या कामकाज बघतात.

कृष्णा जाधव यांची फक्त सामाजिक कार्यातून ओळख मर्यादित न राहता बँकिंग शेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व जोपासल्याचे समजते. श्री. हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. पिशोर या क्षेत्रात व्हॉईस चेअरमन पद देखील त्यांनी उपभोगले आहे.आपल्या कामाचा व्याप वाढवत असताना कन्नड सहकारी साखर कारखाना या ठिकाणी संचालक म्हणून त्यांनी पदभार व्यवस्थीत सांभाळला.

महाराष्ट्र राज्य शेतकरी व कामगार महासंघाचे कार्याध्यक्ष आणि तसेच विविध कार्यकरी सेवा सहकारी सोसायटी पिशोर या ठिकाणी त्यांनी बरेच महत्वपूर्ण योगदान दिले.सर्वात महत्वाचे म्हणजे माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. नाशिक, शाखा : कन्नड या ठिकाणी सचिव म्हणून आपल्या यशाच्या पाऊलखुणा कृष्णा जाधव उमटवत असताना दिसत आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेत, महाराष्ट्र जीवन गौरव त्यांना जाहीर झाला आहे

## राज्यशास्त्र संशोधन केंद्रामार्फत आपले संविधान... अमृत महोत्सव - २०२५ संविधान जागर अभियानास उस्फुर्त प्रतिसाद....



**मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात राज्यशास्त्र संशोधन केंद्रामार्फत भारताचे संविधान भित्तीपत्रकाचे व विविध उपक्रमाचे आयोजनाप्रसंगी अशोक सपाटे, सायबण्णा घोडके, दिपक सांगळे, अमोल गायकवाड, मोहन जाधव, संजय सावंत, महेश मोटे व अन्य**

**मुरूम, ता. उमरगा, ता. ५ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय संविधानाला नोव्हेंबर २०२५ मध्ये अमृत महोत्सवी ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने २०२४-२५ हे संपूर्ण वर्ष भारतीय संविधानाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने श्री माधवराव पाटील महाविद्यालयात अमृत महोत्सव-२०२५ संविधान जागर अभियानांतर्गत राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्र आयोजित संविधान आपले या भित्तिपत्रकाचे उद्घाटन फीत कापून बुधवारी (ता. ५) रोजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विषयाचे प्रा. दिपक सांगळे, भूगोल विषयाचे प्रा. अमोल गायकवाड, दैनिक आरंभ मराठीचे तालुका प्रतिनिधी मोहन जाधव, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी संजय सावंत, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डॉ. सायबण्णा घोडके, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. राजकुमार रोहीकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राज्यशास्त्र विभागामार्फत उद्देश पत्रिकेचे मॉडेल व संविधानाबद्दलचा विस्तारित अहवाल प्राचार्यांकडे सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी सामूहिक संविधानाचे वाचन करण्यात आले. यावेळी मोहन जाधव संविधानाबद्दल म्हणाले की,भारतीय संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक म्हणून नवा अध्याय सुरू केला. संविधान सभेने तयार केलेले संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आले, मात्र २६ जानेवारी १९५० रोजी ते अधिकृतपणे लागू करण्यात आले.

संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांच्या मेहनतीनंतर हे संविधान तयार झाले. यामध्ये लोकशाही, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता यासारख्या मूलभूत तत्वांना प्राधान्य देण्यात आले आहे. संविधान स्वीकारल्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील सरकारने त्या दिवसापासून नवा प्रशासनिक कारभार हाती घेतला. संविधान लागू झाल्यामुळे भारत अधिकृतपणे प्रजासत्ताक राष्ट्र बनले आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा पाया अधिक मजबूत झाला असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी डॉ. घोडके यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य सपाटे यांनी संविधानाचे सर्वांनी आचरण करणे गरजेचे असल्याचे म्हटले. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. राम बजगिरे, डॉ. रमेश आडे, डॉ. अरुण बावा, डॉ. सुजित मटकरी, डॉ. किरण राजपूत, डॉ. अविनाश मुळे, डॉ. संध्या डांगे, प्रा. अजिंक्य राठोड, प्रा. लखन पवार, अमोल कटके आदींनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले तर आभार प्रा. डॉ. रवींद्र आळंगे यांनी मानले. यावेळी फार्मसी कॉलेज व महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध शाखेतील बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ फेब्रुवारी २०२५


## भुसणीतील प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला स्वयंशासन दिनाचा आनंद



भुसणी, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन विद्यालयात स्वयंशासन दिनाप्रसंगी मुख्याध्यापक, सहशिक्षक व स्वयंशासन दिनाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

**मुरूम, ता. उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भुसणी, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन विद्यालयात मंगळवारी (ता. ५) रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन हा उपक्रम शिस्तबद्ध आणि खेळीमेळीत वातावरणात साजरा करण्यात आला. या दिनी विद्यार्थ्यांनी शालेय प्रशासनाचा अनुभव तर घेतलाच पण शिक्षक म्हणून अध्यापन करत विद्यार्थ्यांसमोर प्रत्येक शब्द किती जबाबदारीने वापरावा लागतो. हा अनुभव ही तितकाच महत्त्वाचा ठरला, असे मनोगत शिक्षक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

आजचा हा अनोखा अनुभव देणाऱ्या आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरणार असल्याचा अनुभव व आनंद विद्यार्थ्यांनी शिक्षक या नात्याने व्यक्त केला.

स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका म्हणून कुमारी श्रुती बनसोडे, उपमुख्याध्यापक कुमारी सानिया मुल्ला यांनी काम पाहिले. विद्यार्थी शिक्षक म्हणून प्रशालेतील कुमारी नंदिनी गाडेकर, अनुराधा हिरमुखे, छकुली हिरमुखे, संचिता पाटील, प्रियंका घोडके, लक्ष्मी जामगे, मनीषा कांबळे, स्वाती स्वामी, सौदर्य बनसोडे, जोया पटेल, वैष्णवी पारधे, बर्गलसिद्ध बनसोडे, रोहित गायकवाड, तुकाराम सोनटक्के, रूपाली संगसट्टे, महादेव व्हनाजे, रणजीत घोडके, रत्नदीप गायकवाड, राहुल बिराजदार, दर्शन जमादार, संकेत माळी या विद्यार्थ्यांनी काम पाहिले.

नववीच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक तात्यासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या आजच्या शिस्तबद्ध आयोजनाबाबत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रशालेस डायस सप्रेम भेट दिला. प्रशालेतील सहशिक्षक प्रेमनाथ आमचे, संजीव सकपाळे, महेंद्र गायकवाड, जमीर मुजावर, सोनाली काळे आर्दीनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षाराणी हिरेमठ तर आभार माया गायकवाड हिने मानले.

## अमली पदार्थांच्या व्यसनांपासून तरुण पिढीला दूर ठेवणे काळाची गरज : डॉ. व्ही. एस. सुर्यवंशी यांचे प्रतिपादन.



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज दि.०५/०२/२०२५ वार-बुधवार रोजी समाजशास्त्र विभागांच्या वतीने "अमली पदार्थांचे सेवन आणि व्यसनाधीनता" (Awareness program on Drug Abuse and Addiction) या विषयांवर एक जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.व्ही.एस. सुर्यवंशी उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी अमली पदार्थांचे व्यसनांची सुरुवात ही कुतूहल आणि आनंदानुभवातून होत असली तरी शेवट मात्र दु:खांने होतो.

कारण त्यातून शारीरिक, मानसिक व आर्थिक हानी प्रचंड प्रमाणात होत असते.त्यामुळे अमली पदार्थांच्या व्यसनांच्या चक्रव्यूहातून तरुणांना बाहेर काढने गरजेचे आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पी.पी.टी च्या माध्यमातून अमली पदार्थांचे स्वरूप, त्यांची कारणे,व त्यावरील उपाय योजना स्पष्ट करत अनेक अहवाल, सर्व्हे, कायदे, फोटो, चित्रे,आकडेवारी यांच्या माध्यमातून या विषयांचे गांभीर्य विद्यार्थ्यांना पटवून दिले. तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहून आपले करियर वर लक्ष केंद्रित करावे व महाविद्यालयात चालणाऱ्या विविध उपक्रमात सहभागी होऊन आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास साधावा, असे प्रतिपादन केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ.विलास इंगळे,उपप्राचार्य डॉ.पद्माकर पिटले , कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मुक्ता पोफळे यांनी तर आभार श्री. सैफ इनामदार यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ.डी.व्ही.पडोळे, डॉ. सुमेध राजूरकर,एन.सी.सी.कॅडेट, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खंडणीसाठी अपहरण केलेल्या मुलाची जालन्यात सुटका



**भोकरदन (राहुल थेटे) :** बांधकाम व्यावसायिक सुनील तुपे यांच्या ७ वर्षीय मुलगा चैतन्यचे दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून कारमधून नेत असताना, या कारला मंगळवारी (४ फेब्रुवारी) रात्री दहाला भोकरदनजवळील आसई पाटीजवळ अपघात झाला. अपघातात जखमी अपहरणकर्त्याला नागरिकांनी पकडून भोकरदन ग्रामीण रुग्णालयात नेत पोलिसांच्या ताब्यात दिले.

कारमधील अन्य तीन अपहरणकर्त्यांनी चैतन्यला घेऊन शेतात पळ काढला होता. त्यांनी रात्रीच दुसरी गाडी बोलावून घेत चैतन्यसह चिखलीकडे पळ काढला होता. छत्रपती संभाजीनगरचे पोलीस मागावरच होते. ब्रह्मपुरी (ता. जाफराबाद) येथे अपहरणकर्त्यांच्या मुसक्या आवळण्यात येऊन चैतन्यची सुटका करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

बांधकाम व्यावसायिक सुनील तुपे यांच्या ७ वर्षीय मुलगा चैतन्यचे दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून कारमधून नेत असताना, या कारला मंगळवारी (४ फेब्रुवारी) रात्री दहाला भोकरदनजवळील आसई पाटीजवळ अपघात झाला. अपघातात जखमी अपहरणकर्त्याला नागरिकांनी पकडून भोकरदन ग्रामीण रुग्णालयात नेत पोलिसांच्या ताब्यात दिले. कारमधील अन्य तीन अपहरणकर्त्यांनी चैतन्यला घेऊन शेतात पळ काढला होता. त्यांनी रात्रीच दुसरी गाडी बोलावून घेत चैतन्यसह चिखलीकडे पळ काढला होता.

छत्रपती संभाजीनगरचे पोलीस मागावरच होते. ब्रह्मपुरी (ता. जाफराबाद) येथे अपहरणकर्त्यांच्या मुसक्या आवळण्यात येऊन चैतन्यची सुटका करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.मंगळवारी (४ फेब्रुवारी) रात्री पावणेनऊला सिडको एन-४ मधून तुपे चैतन्यचे कारमधून अपहरण झाले. त्यानंतर अपहरणकर्त्यांनी १५ मिनिटांतच सुनील तुपे यांना कॉल करून खंडणी मागितली होती. अपहरणकर्ते कारमधून चैतन्यला फुलंब्री, हसनाबाद, भोकरदनमार्गे जाफराबादकडे घेऊन जात होते.

भोकरदनजवळील आसई पाटीजवळ भाजीपाला भरण्यासाठी उभ्या गाडीला या कारची धडक बसली. धडक इतकी जोरात होती, की अपहरणकर्त्यांची कार अक्षरशः चक्काचूर झाली. यात अपहरणकर्ते जखमी झाले. त्यांनी त्याही अवस्थेत अंधाराचा फायदा घेऊन चैतन्यसह शेजारच्या शेतात पळ काढला.कारमध्ये अडकून पडलेला प्रणव समाधान शेवत्रे (रा. ब्रह्मपुरी ता जाफराबाद) हाही बाहेर पडून पळ काढणार तितक्यात ज्यांच्या गाडीला धडक दिली त्या गजानन भावले (रा. वालसा वडाळा) यांनी त्याला पकडून ठेवले.

त्याला भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयात आणले.चैतन्यचा अपहरणकर्ता पकडला गेल्याचे कळताच भोकरदन ग्रामीण रुग्णालयात चैतन्यच्या नातेवाइक व नागरिकांनी मोठी गर्दी केली. त्यामुळे प्रणव शेवत्रेला भोकरदन पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते. प्रणवने त्याच्या साथीदारांची नावे पोलिसांना सांगितली. हर्षल शेवत्रे, ज्ञानेश्वर शेवत्रे, जीवन नारायण शेवत्रे सर्व (रा. ब्रह्मपुरी ता. जाफराबाद) अशी अन्य अपहरणकर्त्यांची नावे समोर आल्यानंतर त्यांच्या शोधार्थ पोलीस लागले. जाफराबाद तालुक्यातील ब्रह्मपुरी अपहरणकर्ते चैतन्यसह मिळून आले. अपहरणकर्त्यांपैकी तिघे छत्रपती संभाजीनगरात काम करतात, तर एक पुण्याला असतो. प्रणव छत्रपती संभाजी नगर येथील छत्रपती विद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असल्याचे समोर आले.

छत्रपती संभाजीनगर येथून चैतन्यचे अपहरण करताना अपहरणकर्त्यांच्या कारचा नंबर एमएच २५-११२६ क्रमांकाची नंबर प्लेट वापरली, तर अपघात झाला तेव्हा गाडीला एमएच २०- ईई ७१२६ अशी नंबर प्लेट आढळली. वास्तविक ही गाडी छत्रपती संभाजी नगर येथे गाडी मालकाच्या घरासमोर उभी आहे.घटनेची पार्श्वभूमी...सुनील तुपे कुटुंबासह सिडको एन-४ मधील सेक्टर एफ-१ मध्ये राहतात. सुनील यांच्या सासू मीना शेळके जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा आहेत, तर सासरे रामू शेळके राजकीय नेते आहेत. भाऊ वरिष्ठ शासकीय अधिकारी आहेत. त्यांचे बांधकामासह विविध व्यवसाय आहेत. अपहरणकर्त्यांनी तुपे यांचे घर व आसपासच्या परिसराची रेकी केली. चैतन्य सायकल खेळत होता.

एकटाच मुख्य रस्त्याच्या दिशेने जाताच अपहरणकर्त्यांनी त्याच्या मागे जाऊन काळ्या कारमध्ये ओढले. कार सुसाट वेगाने हनुमान चौक, कामगार चौक, सिडको चौक व पुढे जळगाव रोडच्या दिशेने हर्सल सावंगीकडे गेली. बराच वेळ झाला तरी चैतन्य परत न आल्याने सुनील तुपे त्याला शोधत होते. अपहरणाच्या १५ मिनिटांतच अपहरणकर्त्यांनी तुपे यांना कॉल केला.

अनोळखी क्रमांकावरून आलेल्या कॉलवरील व्यक्तीने त्यांना आधी मराठी व नंतर हिंदीतून बच्चा चाहिए तो २ करोड देना पड़ेंगे, असे धमकावले होते. सुनील यांना ज्या मोबाइलवरून कॉल आला, तो मोबाइल पाल फाट्याच्या पुढे बंद झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ फेब्रुवारी २०२५

# G-Champ Abacus Academy चे घवघवीत उज्जवल यश




**छत्रपती संभाजी नगर** : येथील इनडोअर क्रीडा संकुल गारखेडा येथे २ फेब्रुवारी घेण्यात आलेल्या नेशनल लेव्हल अबेकस कॉम्पिटिशन मध्ये सातारा परिसर बिडबायपास येथील सौ.कल्याणी सुजित अंकूशकर मॅडम च्या , जी चॅम्प अबेकस मधील २१ विद्यार्थ्यांनी नेशनल अवॉर्ड मिळवला यामध्ये सुपरस्टार म्हणजे १०० पैकी १०० गुण घेऊन - सार्थक उगलमोगले स्नेहल उगलमोगले संकेशा म्हस्के वैष्णवी लोटन, यश लोटन, यश मालकर या ७ विद्यार्थ्यांनी अवॉर्ड मिळवला.

काव्या काळे, प्रज्ञा शेळके, आश्लेषा प्रधान, श्रद्धा गायकवाड, कीर्ती गाडेकर, कार्तिक गाडेकर, प्रणव होंडालकर, यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्याच बरोबर आरूष बोराडे, ऋतुजा नजन रणवीर सुलाने तनुश्री दळवी या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

तसेच आरोही बोराडे, अनन्या निसर्गगंध , स्वानंदी डाके, शिवम वाघ यांनी तृतीय क्रमाने बाजी मारली असून सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.सातारा परिसर येथे गेल्या ३ ते४ वर्षापासून चालू असलेल्या जी चॅम्प अबॅकस च्या संचालिका सौ कल्याणी सूजित अंकुशकर मॅडम याची उत्कृष कामगिरी बघता या वर्षी चां २०२५ चा बेस्ट टीचर व फ्रेंच्यायझी अवॉर्ड देखील जी चॅम्प अबॅकस चे संचालक श्री योगेश देशमाने आणि सौ आरती देशमाने मॅडम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले या शाखेचे एकूण ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता ही स्पर्धा अवघ्या ७ मिनिटात १०० गणिते सोडवण्याची होती.

मराठवाड्यातील एकूण ४००० हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर जी चॅम्प अबॅकस ला मिळालेल्या यशामुळे सौ. कल्याणी सुजित अंकुशकर मॅडम व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. अबॅकस म्हणजे गणित च नाही तर मुलांमधील एकाग्रता बौद्धिक विकास आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी जी चॅम्प अबॅकस चां अभ्यासक्रम हे उपयुक्त साधन आहे.

# डीटीएड बीएड स्टुडंट्स असोसिएशन कार्याध्यक्ष पदी प्रशांत शिंदे



**कन्नड (अरुण थोरात):** डीटीएड, बीएड स्टुडंट्स असोसिएशनच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी कन्नड येथील प्रा. प्रशांत पाटील शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यभरातील लाखो डीएड, बीएड धारकांच्या न्यायहक्कासाठी लढणारी संघटना म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या डीटीएड, बीएड स्टुडंट्स असोसिएशनच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी प्रा. प्रशांत पाटील शिंदे यांची नियुक्ती संस्थापक अध्यक्ष संतोष मगर यांनी केली केली आहे.

प्रशांत शिंदे यांनी आजवर केलेल्या शिक्षण क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांची ही निवड करण्यात आली आहे. यानिवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.राज्यातील रखडलेली शिक्षकभरती, सेकंड फेज, 3rd TAIT, शिक्षणसेवक कालावधी रद्द करणे असे विविध प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून आवाज उठविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पंचायत समिती परिसरात स्वच्छता अभियान



**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्र शासनाने ठरवून दिल्यानुसार शंभर दिवसां साठी सात कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत गटविकास अधिकारी चंद्रहार जी ढोकणे यांच्या आदेशाने दि. ०५ फेब्रुवारी रोजी पंचायत समिती कन्नड कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी पंचायत समिती कार्यालयातील व आवारातील परिसर स्वच्छता अभियान कार्यक्रम अतंर्गत हाती घेऊन कार्यालयातील सर्व परिसराची साफसफाई केली. यावेळी संतोष दारकुंडे, रत्नाकर गीते, राजेंद्र चव्हाण, विकास चौधे, नानासाहेब जाधव, विजय वासने, सुसलादे अविनाश, ज्ञानेश्वर गायके. सुभाष ताठे, विनोद उमक, शेख अल्ताफ, ऋषिकेश सूर्यवंशी, विलास सुरडकर, उत्तम गिरी, देवेंद्र बोरसे, श्रीमती बोरसे , श्रीमती घरटे, श्री. गात, श्री सांगळे प्रशांत एपीओ, ईश्वर जाधव, रावसाहेब माळी आदी अधिकारी व कर्मचरी उपस्थित होते.

# बोटिला छिद्र पाडायचे किंवा नाही हे आपणच ठरविले पाहिजे : मेश्राम बी. बी.

## साकेत बुद्ध विहारात ९० वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व साकेत बुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने साकेत नगरातील साकेत बुद्ध विहारात मूकनायकच्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता या विषयावर ९० वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ३१ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाजात असे काही कार्यकर्ते आहेत, ज्यांना त्यानीच किती काळ चळवळीचे कार्य करावे? इतरांनी का करू नये? असे त्यांना वाटत असते. जसे काही त्यांनी फुले शाहू आंबेडकरांपेक्षा चळवळीचे जास्त काम केले असल्याचा आव आणला जातो.

करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला सुरू केलेल्या मूकनायकच्या पहिल्याच अंकातील मनोगतात स्पष्ट केले आहे की, या समाज नौकेतून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांनी लक्षात ठेवले पाहिजे की, जर एखाद्या प्रवाश्यास इतर प्रवाश्याविषयी घृणा वाटत असल्याने त्या प्रवाश्याचा मृत्यू व्हावा म्हणून या सुज्ञ प्रवाश्याने बोटिला छिद्र पाडून बोट बुडविण्याचा प्रयत्न केल्यास इतरांबरोबर छिद्र पाडणा-या सुज्ञ व्यक्तीचा सुद्धा मृत्यू होईल. म्हणून बोटिला छिद्र पाडायचे किंवा नाही हे त्या सुज्ञ व्यक्तींसह आपणच ठरविले पाहिजे. इतर कुणी कार्यात सहभागी होवोत अथवा न होवोत पण ज्यांना चळवळ कळली त्यांनी मात्र कुणाची वाट न पाहता चळवळीत सहभागी झालेच पाहिजे? अन्यथा त्या व्यक्तीचे नाव सुद्धा चळवळ न कळणाऱ्या व्यक्तींच्या यादीत समाविष्ट होईल.

द्वितीय अंकातील स्वराज्याची सर सुराज्याला नाही! या संपादकीय लेखात इंग्रजी शिक्षण हे वाघिणीचे दुध असल्याचे स्पष्ट करून जो प्राशन करील तो गुरगरेल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ब्रिटिश सरकारने भारतीयांना मानवतावादी दृष्टीकोनातून इंग्रजी शिक्षण दिल्याने आपण गुलाम असून फसवणूक होत असल्याची जाणीव झाल्याने त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला परिणामी पुढे स्वातंत्र्य मिळाले. याची सर्व शासकांना जाणीव असते, म्हणून ते जनतेला सुयोग्य शिक्षण देत नसतात. परिणामी शाळा बंद पाडल्या जातात. त्या काळात अस्पृश्य हिताची चर्चा करणारी सोमवंशीय मित्र, हिंदू नागरिक, विटाळ विध्वंसक सारख्या पत्रांचा उदय व अस्त झाला परंतु दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका इत्यादी वृत्तपत्रे सुरू होती. मात्र यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले म्हणणे मांडण्यासाठी हवी तेवढी जागा दिली जात नव्हती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली. ज्यात अग्रलेख, क्षेम समाचार, शेलापागोटे, कुशल प्रश्न, विविध विचार, वर्तमानसार, आमची जखम, आमची हालचाल इत्यादी सदर चालविले जात होते. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आजही दिशादर्शक आहे. या अनुषंगाने आपण कुठे आहोत? याचा शोध घेऊन प्रासंगिकता समजून घेतली पाहिजे.

याप्रसंगी उद्घाटक बुद्धभुषण जाधव म्हणाले की, मूकनायक पत्रकारितेतील महिलाचा दगड आहे. जगण्याचे भांडवल न होऊ देता आपण आपल्या भूमिका पार पाडल्या पाहिजेत. प्रमुख वक्ते डॉ. मिलिंद आठवले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात करून भाषेचा, विविध विषयाचा अभ्यास करून सर्व समावेशक व्यापकता लक्षात घेऊन पत्रकारिता केली होती. शिक्षण, मनोरंजन व ज्ञान ही पत्रकारितेची त्रिसूत्री आहे. वाचकांची मने आणि मनगटे सक्षमीकरणासाठी लेखणी वापरली पाहिजे. प्रस्थापित पत्रकारीतेत परिवर्तनवादाला तिलांजली देऊन अनावश्यक मजकूर छापला जातो. करिता आपण परिवर्तनवादाचे वाहक झाले पाहिजे.

याप्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, ज्यांना वाचता, बोलता येत नव्हते त्यांना व्यक्त होण्याची संधी मूकनायक ने निर्माण करून दिली होती. निष्पक्ष मते मांडण्यासाठी मूकनायक सारख्या पत्रकारितेची आवश्यकता आहे. भीमराव गाडेकर म्हणाले की, मुक्यांचा जो नायक तो मूकनायक होय. गतवैभव प्राप्त करून घेण्यासाठी पत्रकारिता केली पाहिजे. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, परभणी ते मुंबई लाँगमार्च काढल्याची बातमी मीडियात नाही. एड. विलास रामटेके म्हणाले की, समाजाची व्यथा समाज माध्यमांद्वारे शासन प्रशासनापर्यंत पोहचवली पाहिजे. सुभाष ठोकळ म्हणाले की, चळवळीचे मारेकरी कोण? याची जाणीव करून देणारी पत्रकारिता असावी.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर बुद्ध विहार समितीच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला समितीचे अध्यक्ष इंजिनिअर भास्कर म्हस्के हे आवर्जून उपस्थित होते. कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने व प्रास्ताविक प्रा. सुनील दाभाडे तर आभार प्रा. रामप्रसाद डोंगरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला प्रज्वलित बनसोडे, एड. आम्रपाली वाव्हाळे, साधू आनंद, रमेश जाधव, दिनकर जाधव, मधुकर साळवे, सुधीर सुरडकर, शिला जाधव, महादेव डांबरे, इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

**शब्दांकन : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल,
छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ फेब्रुवारी २०२५


# मेंदू कुणाचा? हात कुणाचे?

माणूस हा समाजशील प्राणी आहे. आपले स्वत:चे अस्तित्व समाजाशिवाय तो निर्माण करू शकत नाही. आपले विचार समाजाला कळल्याशिवाय त्याचे स्वत:चे अस्तित्व निर्माण करू शकत नाही. स्वत:चे अस्तित्व आणि विचार निर्माण करण्यासाठी त्याने निरीक्षण आणि वाचन करणेही महत्त्वाचे असते. निरीक्षण आणि वाचन केल्याशिवाय तो विचार करू शकत नाही.

वाचन माणसाला संपन्न, समृद्ध, विवेकशील बनवत असतं. हे संपन्न, विवेकशील आणि समृद्ध झालेलं मनच समाजात एक क्रांती म्हणजेच बदल घडवून आणू शकतं. मनाने समाज व्यवस्थेचा अभ्यास करून समाज व्यवस्था ओळखायला हवी तरच मानवी मन आणि समाज समृद्ध होईल. आज-काल जिकडे तिकडे लहान असो किंवा मोठा असो, गरीब असो किंवा श्रीमंत असो, शहरातला असो किंवा खेड्यातला असो, विद्यार्थी असो किंवा शिक्षक असो किंवा कुठल्याही जाती धर्मातील असो त्यांची मने मात्र अपरिपक्व आणि असंवेदनशील होताना दिसत आहेत.

त्यामुळेच देशात आज अराजकता, भ्रष्टाचार, अनिती, विषमता फोफावताना दिसत आहे. या साऱ्या गोष्टींची उकल व्हावी म्हणून प्रा. डॉ.आर.जी. इंगोले यांचा 'मेंदू कुणाचा? हात कुणाचे?'हा वैचारिक ग्रंथ महत्त्वाचा वाटतो.प्रा. डॉ. आर जे. इंगोले यांचा नुकताच ' मेंदू कुणाचा? हात कुणाचे?' हा पंचफुला प्रकाशन,औरंगाबाद मे प्रकाशित केलेला चारशे आठ पानांचा ग्रंथ आहे. या ग्रंथात एकूण सत्त्याहत्तर विविध विषयावरील लेख आहेत. त्यांचे अनेक लेख मुंबईच्या दैनिक वृत्तरत्न सम्राट मधूनही प्रकाशित झालेले आहेत.

स्वत: लेखक हे समाज चिंतक, विचारवंत व अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक आहेत.हे लेख निश्चितच माणसाचे मस्तक संपन्न करणारे आहेत. माणसाला खरेपणाची म्हणजे सत्याची जाणीव करून देणारे आहेत. जीवन जगत असताना माणूस अनेक खोट्या, काल्पनिक गोष्टी घेऊन जगत असतो. अशा या खोट्या आणि काल्पनिक गोष्टी घेऊन जगणारा माणूस स्वत:चे अस्तित्व हरवून बसतो. स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी विचार किती महत्त्वाचे असतात हेच या ग्रंथातून प्रा. डॉ.आर.जे. इंगोले यांनी दाखवून दिले आहे.आजच्या हल्लीच्या म्हणजे आधुनिक काळातील सामाजिक,धार्मिक,राजकीय,आर्थिक,शैक्षणिक,सांस्कृतिक, बौद्धिक व इतरही क्षेत्रातील परिस्थिती फार म्हणजे फारच गोंधळाची असल्याची दिसून येते. जाणवतेही.

हल्लीची परिस्थिती ही इथल्या प्रत्येक माणसाला, तरुणाला, सुशिक्षिताला, सामान्य माणसाला सत्यापासून कोसो दूर लोटणारी आहे, भ्रम निर्माण करणारी आहे असेच चित्र दिसते. भयग्रस्त अशी परिस्थिती आहे.वर्तमानकाळ हा हल्ली अस्वस्थ दिसत आहे. सामान्य जनता त्रस्त आहे. शिकलेले तरुणही नौकरी विना बेरोजगार आहेत. महागाई गगनाला जाऊन भिडली आहे. तरिही समाजात,देशात अंधश्रद्धा,रूढी परंपरा, जात,धर्म, यांचे पीक भरघोस प्रमाणावर वाढत आहे. मुद्दामहून वाढविले जात आहे सरकारही त्याला कुंभमेळा,काळी जादु,पांढरी जादु अशा प्रकरणावरून खतपाणी घालताना दिसत आहे. या अशा अनेक विविध साऱ्या प्रश्नांची चर्चा 'मेंदू कुणाचा? हात कुणाचे? या ग्रंथात प्रा. डॉ .आर.जे.इंगोले यांनी केली आहे. ही चर्चा किंवा लेखन वाचकाला किंवा सर्वसामान्य माणसाला दिशादर्शक, मार्गदर्शक निश्चितच ठरणारे आहे.

भोंदूगिरी, अंधविश्वास या जाळ्यात अडकलेल्यांना निश्चितच त्यातून बाहेर काढण्यास मदत करणारे हे लेखन आहे. आजच्या म्हणजे सध्याच्या वर्तमान काळातही खूप कमी लोक पुरोगामी विचाराने जगताना, वागताना किंवा आचरण करताना दिसतात. सामान्य लोक आजही सनातन विचारांच्या विळख्यात अडकली आहेत. महिलांचाही समावेश यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर आहे. या सर्वांचा समावेश शाळापेक्षाही मंदिराकडे अडकत चालला आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवनात अधोगती होताना दिसत आहे. जीवनाची वाटचाल अंधकारमय होताना दिसत आहे. बहुजन समाज ही काल्पनिक कर्मकांडामध्ये अडकला व मुद्दामहून अडकविला जात आहे. शिक्षणामुळे समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन येतो.

समाजाचा विकास होतो. शिक्षण हे सर्व दु:खण्यावरचा उपाय आहे. फुले, शाहू व आंबेडकरांनी सांगितलेल्या शिक्षणाच्या विचारांची कास प्रत्येकाने धरायला हवी. त्यांच्याच विचारांची गरज खऱ्या अर्थाने आज देशाला आहे. हे मात्र आम्ही विसरून चाललो आहोत. हे लेखकांनी ' इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले ' या प्रकरणात अगदी मुद्देसूदपणे मांडले आहे.आज बहुजन समाज मोठ्या प्रमाणावर गुलाम होताना दिसत आहे. त्यांच्याकडून संस्कृतीच्या नावाखाली सण, उत्सव साजरी करून घेतले जातात. त्यांच्याकडूनच विविध क्षेत्रात विघातक घटना घडवून आणल्या जातात. आजच्या राजकारणातही काही मूठभर लोक धर्माच्या, जातीच्या नावाखाली रूढी, परंपरा व अंधश्रद्धेचे विष पेरताना दिसत आहेत.

हे विष पेरण्याचे काम सबंध बहुजन समाजाच्या हातातून केले जाते.हे वाईट आहे. खरे तर एखादा नवीन विचार कोणत्याही व्यक्तीच्या मेंदूत पहिल्यांदा येतो. त्या विचारांची अंमलबजावणी त्याच व्यक्तीने करायला हवी. तरच त्या विचाराची परिणामकारकता चांगली दिसून येते.फुले,शाहू, आंबेडकरी विचारांची परिणामकारकता आज आपल्याला दिसून येत आहे. पण अलीकडे तसे होताना दिसत नाही. कारण एखादी योजना एका मेंदूत असते व त्याची अंमलबजावणी मात्र दुसरे करताना दिसतात. म्हणजेच आजच्या परिस्थितीत अनेक जण स्वत:च्या बुद्धीने चालण्याऐवजी दुसऱ्याच्या बुद्धीने चालताना खोट्यालाही खरे म्हणताना दिसतात.

त्यांच्यामध्ये खोट्याला नकार देण्याची हिंमत होत नाही.त्यामुळे देश विकसित किंवा महासत्ता होण्याऐवजी अधोगती कडे जाताना दिसत आहे. समाज मानसिक गुलाम झाला की तो अधोगतीकडे जातो. त्यामुळे अनेक पिढ्यांचे नुकसानही होते. त्यामुळे बहुजनांनी एक होणे काळाची गरज आहे. आपली ताकद मोठी आहे. आपल्याला छत्रपती शिवरायांच्या विचारांचा, बुद्ध,फुले,शाहू व आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्याची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे. तेच विचार हल्ली जातीय , धर्मांध,अंधविश्वासू, अनैतिक, कर्मकांडी,दलदलीतून आपणास बाहेर काढण्यास मदत करतील. हे सारे सर्वसामान्य बहुजन समाजातील माणसाने लक्षात घेऊनच वाटचाल करायला हवी.असे लेखक प्रा. डॉ.आर.जी. इंगोले यांना वाटते.

म्हणून त्यांनी 'मेंदू कुणाचा ? हात कोणाचे? या प्रश्नात्मक लेखातून विश्लेषण केले आहे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. साहित्यिकाने समाजातील प्रश्न अगदी बिनदिक्कतपणे व परखडपणे मांडले पाहिजेत. साहित्यिकांचा, पत्रकारांचा, विचारवंतांचा दबाव शासनावर असायला हवा. साहित्यिकांनी,विचारवंतांनी सत्य परिस्थिती आपल्या लेखनातून उजागर करायला हवी. तरच समाजाला मार्गदर्शन मिळत असते. पण आत्ताच्या साहित्यिक, विचारवंत, पत्रकारांना या गोष्टीचे भान राहिले नाही. आपली जबाबदारी काय? हे ते सारे विसरलेले दिसत आहेत. लोकांना बरं वाटणारं साहित्य ते निर्माण करताना दिसतात. खरं साहित्य त्यांच्या लेखणीतून पाझरताना दिसतच नाही.

आशा म्हणजे फक्त बरं लिहिणाऱ्या साहित्यिकांनाच सरकारही पुरस्कार देताना दिसत आहे. लेखकांनी, विचारवंतांनी समाजास लढण्याची प्रेरणा देणारे साहित्य लिहायला हवे. समाजाला परिवर्तनासाठी तयार करायला लावणारे साहित्य निर्माण करायला हवे. कारण साहित्य आणि कलेचा प्रभाव समाज मनावर जास्त असतो. त्यामुळे त्यांनी हे प्रामाणिक काम करायला हवे.

साहित्यिकांनी सतत जागृत राहून स्वार्थ बाजूला ठेवून आपली लेखणी चालवायला हवी असे लेखकाला वाटते म्हणून प्रा. डॉ.आर.जे. इंगोले आपल्या लेखातून सांगतात ' साहित्यिक आणि विचारवंतांनी बरं बोलण्यापेक्षा खरं बोलावं 'अशाप्रकारे प्रा. डॉ. आर.जे.इंगोले समाजातील विविध क्षेत्रातील वास्तविकता विविध लेखातून बुद्धी प्रामाण्यवादी दृष्टिकोनातून ते उलगडून दाखवताना दिसतात. पुस्तक वाचल्यानंतर निश्चितच वाचकांची, साहित्यिक, विचारवंताची झापडं उघडल्याशिवाय राहणार नाहीत.

आपणच आपल्या पायावर दगड मारून घेत आहोत ही जाणीव बहुजन समाजाला झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून हे पुस्तक प्रत्येकानी वाचायला हवे. आपल्या मेंदूतून आलेल्या विचारांची अंमलबजावणी स्वत:च करायला हवी. तरच समाजाचे,देशाचे भवितव्य प्रकाशमय आहे.होईल. हे लेखकाने ग्रंथातील पानापानातील शब्दातून दाखवून दिले आहे.

या ग्रंथातील भाषा सहज, ओघवती, साधी,सोपी, चिंतनशील, परिवर्तनशील,विचार करायला लावणारी आणि वाचकाच्या हृदयाचा ठाव घेणारी आहे. त्यामुळे हा ग्रंथ संदर्भग्रंथ असून प्रत्येकाने आवर्जून वाचावा व त्या दिशेने वाटचाल करावी एवढेच या निमित्ताने सांगावेसे वाटते.





**प्रा. डॉ. सतीश मस्के**
कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर ता.साक्री जि.धुळेमो.9423397484


मेंदू कुणाचा ? हात कुणाचे ?
लेखक:
**प्रा. डॉ. आर.जे.इंगोले**
पंचफुला प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद) पृष्ठे: 408, मूल्य: 450 रु.

# मी घेतली हातात झाडू

मी घेतली हातात झाडू

अन् झाडता झालो केरकचरा...

वाट्याला आलेला न आलेला..

साराचखोप्यातील लेकरांच्या
चोचीत
दोन घास भरवण्यासाठी.

अन्
त्यांच्या चिमुकल्या पंखांना

आकाशात गरुड भरारी घेण्याचं

सामर्थ्य मिळण्यासाठी.

आताफक्त झाडूने निघत नाही

साराच कचरा व्यवस्थेचा अन्
समाजमनाचा..

म्हणून हाती लेखणी घेतोय

नाठाळाच्या माथी काठी हाणनाऱ्या
तुकोबांची

गाडगेबाबाच्या झाडूसोबत.




**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
**+९१ ९४०३३ ८४८८९**



